दैनिक

# प्रवक्ता लोकशाहीचा

PRAVAKTA LOKSHAHICHA

मुख्य संपादक – नितीन रावण मुजमुले, मो.नं.९६७३२१०४३८

Email :- pravaktalokshahicha@gmail.com Web :- https://pravaktalokshahicha.com

■ बीड (महाराष्ट्र) ■ दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०१ ■ अंक – १७१ ■ सोमवार दि. २ मार्च २०२६ ■ आरएनआय – एमएचएमएआर/२५/ए२३६९ ■ किंमत २ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily ■ Marathi ■ Year - 01 ■ Issue - 171 ■ Monday Dt. 2 March 2026 ■ RNI: MHMAR/25/A2369 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4





पंकजा मुंडे - मी आहे मंत्री कधी खाते चक्की तर कधी खाते संत्री

धनंजय मुंडे - करुणामय एकच नेता, धनु भाऊ धनु भाऊ!

विजयसिंह पंडित - मी आहे गोदाकाठचा वाघ, म्हणून तर लावली बीडची वाट!

सुरेश धस - झंन्टात फंटा शिकवू नका, आम्हाला दादागिरी दाखवू नका!

प्रकाश सोळंके - पाटलाचा नाद केला म्हणून, पुढील काळ अंधारात गेला!

बजरंग सोनवणे - इतिहास गेला धून, मी आलो तेल लावून!

नमिता मुंदडा - मी नुसती नावालाच दलित, त्याचेच घेते फलीत!

पप्पू कागदे - मी आहे कायम युवा अध्यक्ष

बाबुराव पोटभरे - राजकारण सरलं, कधीच नाही पूरलं!

योगेश क्षीरसागर - मी आहे बंगल्याचा लाल, कुणास ठाऊक कधी लागणार गुलाल!

संदीप क्षीरसागर - मिच मारणार बाजी, कारण मी आहे दाजी!

अजिंक्य चांदणे - मी नाही माघारी सरत, पण राजकारणात कधीच काही नाही उरत!

विनोद मुळुक - कुणाच्या खेळीत आला नाही नंबर, तरी झालो परमनंट मेंबर

प्रमोद शिंदे - सत्तेच्या सूत्रात आले अण्णा वाट्याला झन्ना मन्ना

सुनील शिंदे - किती उडवली पक्षाची आवई, मी मात्र फक्त लाडका जावई!

महादेव इनकर - अँकर अँकर का नाम हैं, महादेव इनकर इनकर!

सुनील पाटील - पिढ्यान पिढ्या राजकीय संचित मी मात्र कायम वंचित

राहूल साळवे - मी आहे वकील, नाव माझं राहुल. बीड कॉंग्रेसमध्ये माझाच माहुल

गोविंद साठे - इमानदारीने नेता जपला, नेत्यानेच पत्ता कापला!

फिडेल चव्हाण - चळवळीचा वारसा कधी सरत नाही, कितीही लढलो तरी गल्ला भरत नाही!

अजय सरवदे - राजकारणाचं काहीच नाही संचित, तरी मी आहे वंचित!

# शरद पवारांविरोधात टीकेचा सूर का?

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरुवारी अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांनी ही जबाबदारी घेतल्याने आता एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस या दोन गटांमधील मतभेद मिटण्याची आणि विलीनीकरणाच्या दिशेने ठोस पाऊल पडण्याची शक्यता आता धूसर झाली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी नव्या अध्यक्षांची नियुक्ती म्हणजे 'सुनेत्रा पर्वा'ची सुरुवात असल्याचे म्हटले आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी हा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे की, ते शरद पवार गटाच्या कोणत्याही दबावाला बळी पडणार नाहीत. सुनेत्रा पवार या स्वतःच्या अटींवर पक्ष चालवतील आणि अजित पवारांचा राजकीय वारसा व विचार पुढे नेतील. या घडामोडींमुळे काही प्रश्न निर्माण होत आहेत. ते म्हणजे राष्ट्रवादीने आता शरद पवार गटाकडे पाठ का फिरवली आहे? 'सुनेत्रा पर्वा'ने शरद पवार गटाच्या नेतृत्वासमोर राजकीय आव्हान उभे केले आहे का? एकूणच महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर याचे काय परिणाम होतील? मुंबईतील राष्ट्रवादीच्या मेळाव्यात सुनेत्रा पवार यांनी अध्यक्ष म्हणून पहिल्यांदा भाषण केले. अजित पवारांची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी या भाषणात दिली. तसेच राजर्षी शाहू, जोतिराव फुले आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या विचारसरणीवर आधारित अजित पवारांच्या धोरणांना समोर ठेवून आपण काम करू, असे सांगितले. या भाषणादरम्यान अजित पवारांच्या भव्य पोस्टरसमोर उभ्या असलेल्या सुनेत्रा पवारांनी कार्यकर्त्यांशी भावनिक नाते जोडण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांच्या वागण्यात खंबीरपणा दिसत होता आणि त्यांच्या मनात असलेली वेदनाही स्पष्टपणे जाणवत होती. राष्ट्रवादीच्या या मेळाव्यात अनेक नेत्यांचा आक्रमक पवित्रा पाहून अनेकांना आश्चर्य वाटले. वरिष्ठ नेत्यांनी शरद पवारांना लक्ष्य केले, त्यामुळे दोन्ही गटांमधील मतभेद पुन्हा एकदा स्पष्ट झाले. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले, आम्ही आमचा पक्ष कसा चालवायचा हे ते (शरद पवार गट) आम्हाला कसे काय सांगू शकतात?. राज्याचे कॅबिनेट मंत्री व ज्येष्ठ नेते छगन भुजबळ म्हणाले, अजित पवारांचे अंत्यसंस्कार होण्यापूर्वीच त्यांनी (शरद पवार गट) विलीनीकरणाच्या गप्पा सुरू केल्या. एवढी घाई कशासाठी? त्यांनी राजकारण सुरू केले, म्हणूनच राष्ट्रवादीला सुनेत्रा पवारांच्या शपथविधीची प्रक्रिया घाईने उरकावी लागली. आता सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादीला प्रश्न विचारण्याचा त्यांना काय अधिकार आहे? प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शरद पवारांवर टीका करत म्हटले, २००४ च्या विधानसभा निवडणुकीत जेव्हा राष्ट्रवादी सर्वांत मोठा पक्ष ठरला होता, तेव्हा अजित पवार मुख्यमंत्री होऊ शकले असते; पण काँग्रेसला मुख्यमंत्रिपद देऊन आम्ही अजितदादांसारख्या सक्षम नेत्याला त्या पदापासून वंचित ठेवले. या मेळाव्यात अजित आणि सुनेत्रा पवारांचे ज्येष्ठ पुत्र पार्थ पवार यांची मार्चमधील राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारीही जाहीर करण्यात आली. त्यामुळे पक्षात सुनेत्रा पवार कुटुंबाचे नेतृत्व अधिक मजबूत झाले आहे. सत्ताधारी महायुतीचा घटक असल्याने राष्ट्रवादीकडे पार्थ यांना वरिष्ठ सभागृहात निवडून आणण्यासाठी पुरेसे आमदार आहेत. दुसरीकडे, शरद पवारांचे राज्यसभा सदस्य म्हणून टिकून राहणे आता विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीच्या एकत्रित निर्णयावर अवलंबून आहे. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार)कडे केवळ १० आमदार आहेत. त्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)च्या २० आणि काँग्रेसच्या १६ आमदारांच्या पाठिंब्याशिवाय पवारांना त्यांची राज्यसभेची जागा राखणे कठीण जाईल. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजूनही अनिश्चिततेचे वातावरण आहे. पक्षातील अनेक चेहरे असा प्रश्न निर्माण करत आहेत की, राष्ट्रवादीचे नेतृत्व २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा विजय सुनिश्चित करू शकेल का? विलीनीकरणाच्या बाजूने असलेल्या राष्ट्रवादीच्या एका मंत्र्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, सर्व काही शांत दिसत असले तरी पक्षाच्या आत अस्वस्थता आहे. भविष्यात काय होईल याची प्रत्येकाला चिंता आहे. ते पुढे म्हणाले, जेव्हा शरद पवारांनी (जून १९९९ मध्ये) स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा अनेकांनी त्याला विरोध केला होता. याचे कारण म्हणजे त्यांचे काँग्रेसबरोबरचे संबंध केवळ राजकीय नसून, भावनिक आणि पिढ्यान् पिढ्यांचे होते. तरीही, बहुतांश नेत्यांनी तत्कालीन नव्याने स्थापन झालेल्या राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतला, कारण– त्यांचा शरद पवारांच्या नेतृत्वावर विश्वास होता. जुलै २०२३ मध्ये जेव्हा अजित पवारांनी राष्ट्रवादी पक्ष फोडला होता. तेव्हादेखील त्यांच्या गटात सामील झालेल्या बहुतेकांनी शरद पवारांना कल्पना देऊनच हा निर्णय घेतला होता. आम्ही पवार आणि अजितदादांमध्ये कधीही फरक केला नाही. आमच्यासाठी दोन वेगळे पक्ष केवळ कागदावर होते. आम्हाला माहीत होते की, हे मतभेद परिस्थितीमुळे निर्माण झाले आहेत आणि आज ना उद्या आमचे विलीनीकरण होईलच, असे दोन्ही गटांतील अनेक नेत्यांनी सांगितले. परंतु, अजित पवारांच्या अकाली निधनानंतर विलीनीकरणाच्या आशा संपुष्टात आल्याचे त्यांनी सांगितले. विलीनीकरणाच्या चर्चेत सहभागी असलेल्या राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) च्या एका नेत्याने सांगितले, विलीनीकरणाची चर्चा अजितदादांच्या पुढाकाराने प्रगत टप्प्यावर होती, तरीही शरद पवार स्वतः एनडीएमध्ये सामील झाले असते की नाही, याचा अंदाज आम्ही लावू शकत नाही. ते कदाचित तटस्थ राहिले असते. पण, मला एक खात्रीने माहीत आहे की, अजितदादांना दोन कारणांमुळे विलीनीकरणाची घाई होती. एक म्हणजे, आपली आई आशाताई आणि शरद पवारांच्या उपस्थितीत विलीनीकरण करून काकांपासून वेगळे झाल्याचा डाग पुसून टाकणे आणि दुसरे म्हणजे स्वतंत्र राहिलो, तर भाजपा आपल्याला संपवून टाकेल, अशी भीती त्यांना वाटत होती. रोहित पवार विलीनीकरणाविषयी बोलताना म्हणाले, विलीनीकरण कोणाला हवे आहे? मी पहिल्या दिवसापासून स्पष्ट केले आहे की, आम्हाला विलीनीकरण नको आहे. आमची लढाई अजित पवारांना न्याय मिळवून देण्यासाठी आहे. त्यांचा अपघात नेमका कशामुळे झाला, हे महाराष्ट्रातील जनतेला समजायला नको का?. राष्ट्रवादीच्या या दोन्ही गटांतील संघर्ष पुन्हा पेटल्याचे चित्र आहे आणि त्यामुळे त्यांचे विलीनीकरण होऊ न देण्याची भाजपाची रणनीती आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे.

# आंबेडकरी चळवळ : आत्मपरीक्षणाची गरज आणि नव्या दिशांचा शोध

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेली आंबेडकरी चळवळ ही केवळ सामाजिक सुधारणांची नव्हे, तर सत्ताकेंद्रांच्या पुनर्रचनेची आणि शासननिर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकणारी मूलगामी राजकीय चळवळ होती. बाबासाहेबांच्या मते, सामाजिक न्याय केवळ नैतिक आवाहनातून साध्य होत नाही, तर तो राज्यसत्तेच्या माध्यमातून संस्थात्मक रूप धारण करतो. त्यामुळेच त्यांनी स्पष्टपणे मांडले होते की राजकीय सत्ता ही सर्व सामाजिक प्रगतीची किल्ली आहे.त्यांनी उभारलेल्या सामाजिक व राजकीय लढ्यामुळे भारतीय समाजातील बहिष्कृत, वंचित व दलित वर्गाला शिक्षण, नोकरी, प्रतिष्ठा व सामाजिक उन्नतीची दारे खुली झाली. हजारो–लाखो कुटुंबाचे जीवनमान बदलले, समाजात एक नवशिक्षित मध्यमवर्ग निर्माण झाला आणि सामाजिक आत्मसन्मानाची जाणिव दृढ झाली. ही बाब आंबेडकरी चळवळीचे सर्वात मोठे ऐतिहासिक यश मान्य करावी लागेल. परंतु याच यशातून निर्माण झालेल्या नवशिक्षित, नोकरदार वर्गाच्या सहभागाबाबत वर्तमान आंबेडकरी चळवळीची दिशा व स्वरूप गंभीर प्रश्न निर्माण करणारे ठरत आहे. या आंबेडकरी चळवळीतून उदयास आलेल्या शिक्षित नोकरदार वर्गाचे मोठ्या प्रमाणात फक्त आणि फक्त केवळीकरण झाले आहे, नव्हे तर समाजातील स्वार्थी, रिकामटेकडे सन्मान प्रतिष्ठीत लोकांनी तसं केलं आहे. खरे तर बाबासाहेबांच्या लढ्यामुळे निर्माण झालेला शिक्षित, बुद्धीजिवी, नोकरदार, मध्यमवर्ग हा या चळवळीचा कणा असायला हवा होता. पण प्रत्यक्षात हा वर्ग आज फक्त वर्गणी, देणग्या, खर्च उचलणे या मर्यादित भुमिकेत अडकला गेला आहे.त्याचे बौद्धिक योगदान, प्रशासकीय कौशल्य, सामाजिक नेतृत्व, धोरणात्मक सहभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. एवढेच नव्हे तर हा वर्ग या सामाजिक कार्यात पुढाकार घेऊ नये म्हणून भाऊबंदकीत वाद निर्माण करणे, तुच्छ लेखणे, घालून पाडून बोलणे, व महत्वाच्या कौटुंबिक कार्यक्रमात अनुल्लेख व दुर्लक्षित करणे असे अपमानित करून समाजापासून दुर कसा राहील असे प्रयत्न केले जात आहेत.यामुळे हा वर्ग चळवळीपासून भावनिक व वैचारिक दृष्ट्या दूर जात आहे, जे दीर्घकालीन दृष्टीने समाजासाठी घातक आहे. नोकरदार वर्गाला वर्गणी, देनगी, पुढाकार या मोबदल्यात समाजातील या कार्यक्रमजीवी कार्यकर्त्यांकडून 'अवहेलना' मिळत आहे या सर्व अंगांनी विचार केला तर आजची आंबेडकरी चळवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या मूलभूत तत्त्वज्ञानापासून लक्षणीयरीत्या दूर गेली असून, ती आज कार्यक्रमप्रधान, भावनिक आणि प्रतीकात्मक स्वरूपात अडकलेली दिसते. प्रारंभी ही आंबेडकरी चळवळ सामाजिक क्रांतीची प्रक्रिया होती.तिचा मुख्य केंद्रबिंदू अस्पृश्यतेचा अंत, सामाजिक समता, समाजाचे शैक्षणिक व सामाजिक प्रबोधन, राजकीय हक्क, आर्थिक स्वावलंबन हे होते. परंतु कालांतराने या चळवळीचे स्वरूप संघर्षात्मक चळवळीवरून केवळ कार्यक्रमप्रधान औपचारिकतेकडे झुकलेले दिसते. याचा सर्वात गंभीर परिणाम असा झाला की, शासननिर्णय निर्मिती, धोरण–रचना निर्मिती आणि सत्तेवर प्रभाव टाकण्याची क्षमता या चळवळीतून मोठ्या प्रमाणात क्षीण झाली आहे. आज ही आंबेडकरी चळवळ म्हणजे जयंती, पुण्यतिथी, मेळावे, सभा, डीजेयुक्त मिरवणूका, उथळ भाषणबाजी आणि औपचारिक गौरव यातच चळवळीची ऊर्जा खर्च होताना दिसते.परंतु या अशा कार्यक्रमांतून समाजजीवनात मुलग्राही बदल घडवणारी ठोस कृती कमी पडत आहे.

म्हणून असे म्हणावसे वाटते की, निष्पत्तीशुण्य कार्यक्रमाचे आयोजन आणि नुसती प्रतीकात्मक सक्रियता या पलीकडे ही चळवळ पुढे जाताना दिसत नाही. मजबूत सामाजिक संघटन, समाजातील मुलांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम, रोजगार निर्मितीतून आर्थिक स्वावलंबन आणि स्थानिक समस्या निर्माण यासाठी दीर्घकालीन, नियोजित, संघटित कृती आढळत नाही. यामुळे ही चळवळ प्रतिकात्मक सक्रियता (Symbolic -ctivism) व प्रतिक्रियावादी या टप्प्यावर अडकलेली दिसते. म्हणजे बोलणे जास्त, कृती कमी असे झाले आहे.

आंबेडकरी चळवळ आज शासन निर्णय निर्मितीपासून तुटलेली चळवळ झाली आहे आधुनिक लोकशाहीत खरा संघर्ष हा रस्त्यावर नाही, तर धोरण कक्षांमध्ये (policy corridors) चालतो.

शासन निर्णय (GR), कायदे, नियम, धोरण चौकट, अर्थसंकल्पीय तरतुदी यामध्ये ज्यांचा हस्तक्षेप असतो, तेच समाजाच्या भविष्याची दिशा ठरवतात.



रामचंद्र गायकवाड,
प्राचार्य, कर्जत.जि. रायगड

बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून, कायदे निर्मितीतून, प्रशासकीय रचनांमधून, वंचित घटकांना संस्थात्मक संरक्षण दिले.

मात्र आज या कार्यक्रमजीवींच्या स्वार्थी व मतलबी भुमिकेमुळे आंबेडकरी चळवळ धोरण विश्लेषण, शासन निर्णयांचा अभ्यास, मसुदा धोरण सुचवणे, तज्ञ समित्यांमध्ये प्रतिनिधित्व, या क्षेत्रात सुसंगठित व प्रभावी सहभाग यात आघाडी घेताना दिसत नाही. परिणामी, सरकारच्या धोरण प्रक्रियेत आंबेडकरी दृष्टिकोन आज दुय्यम ठरत आहे. धोरण निर्मितीतील वैचारिक दारिद्र्य असणे ही बाब आंबेडकरी चळवळीसाठी चांगले नाही.

आज सामाजिक न्यायाशी निगडित धोरणे, शिक्षण, रोजगार, आरक्षण, खाजगीकरण, डिजिटल अर्थव्यवस्था, कौशल्य विकास या नव्या क्षेत्रांत झपाट्याने बदल घडवून आलले आहेत.

मात्र आंबेडकरी चळवळ या बदलत्या धोरण विश्वाशी वैचारिक संवाद साधताना अपयशी ठरत आहे. यासाठी आंबेडकरी चळवळी जवळ अभ्यासक संस्था नाहीत, थिंक टँक आहेत पण त्यांच्याजवळ कोणी जात नाही, व त्यांना विचारणाही केली जात नाही. धोरणात्मक सहभाग नाही, संशोधन केंद्र नाहीत, परिणामी, चळवळ घटनात्मक हक्कांचे संरक्षण करणाऱ्या सत्तासंरचनेवर दबाव निर्माण करण्यात अपयशी ठरली आहे.

आजची आंबेडकरी चळवळ कार्यक्रमजीवी कार्यकर्ते व स्वार्थी नेतृत्वाच्या हाती बंदीस्त झालेली दिसते. कार्यक्रम म्हणजे निधी संकलन, संघटना म्हणजे वैयक्तिक प्रतिष्ठा, चळवळ म्हणजे राजकीय सौदाबाजी अशा विकृतींनी आंबेडकरी चळवळीला विळखा घातल्यामुळे या चळवळीचे मुळ नैतिक अधिष्ठान कमकुवत होत चालले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीला विवेक, सत्ता प्राप्ती घोषणांपासून संघटित राजकीय रणनीतीकडे घेऊन गेले होते.

त्यांच्या राजकीय दृष्टिकोनात सत्ता ही केवळ प्रतिनिधित्व नव्हे, तर सामाजिक पुनर्रचनेचे साधन होती.

परंतु आज आंबेडकरी राजकारण 'व्यक्तीकेंद्री', 'गटबाजीग्रस्त अल्पकालीन युतीवर' आधारीत धार्मिक ध्रुवीकरणावर अवलंबून झालेले दिसते.यामुळे सत्तेचा प्रभावी सहभाग, धोरणात्मक सौदेबाजी, दिर्घकालीन सत्ता बांधणी या बाबी दुर्लक्षित राहताना दिसत आहेत.

या समाजाचा सत्तेतील सहभाग पाहिला तर संख्यपुरतेही प्रतिनिधित्व मिळत नाही आणि यामुळे धोरणात्मक प्रतिबिंबाचा अभाव मोठ्याप्रमाणात पडताना दिसून येते. आज आपण विविध पातळ्यांवर आंबेडकरी विचारधारेतील प्रतिनिधी सत्तेत असले तरी ते धोरण निर्मितीत निर्णायक भुमिका बजावताना दिसत नाहीत. याचा परिणाम ते प्रशासकीय यंत्रणांवर दबाव निर्माण करण्यात अपयशी ठरतात. सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर आक्रमक हस्तक्षेप करीत नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे 'संघटीत दबाव गटाचा (Pressure Group) अभाव' हे या चळवळीचे मोठे दुर्गुण आहे.

बाबासाहेबांनी ज्या संघटित चळवळीच्या माध्यमातून सत्ता–केंद्रांवर दबाव टाकला, ती परंपरा आज जवळपास लुप्त झालेली आहे.याचा परीणाम असा झाला की, सत्तेवर दबाव व वर्चस्व टाकण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोणतीही प्रभावी चळवळ फक्त सत्तेत जाण्यावर भर देत नाही, तर सत्तेवर सातत्यपूर्ण दबाव निर्माण करते. पण आज आंबेडकरी चळवळ
आंदोलनांची सातत्यशीलता,
तथ्याधारित मागण्या, कायदेशीर हस्तक्षेप, माध्यम व्यवस्थापन, यामध्ये आजच्या घडीला तरी पिछाडीवर आहे. यामुळे वर्चस्ववादी सत्तासंरचना अधिकाधिक दृढ होत असून, सामाजिक न्यायाचा अजेंडा दुय्यम ठरत आहे.

म्हणून आज कधी नव्हे तेवढी नव्या राजकीय हस्तक्षेपाची गरज निर्माण होत असतांनाच 'कार्यक्रमातून धोरणाकडे' जाण्याची गरज निर्माण झाली आहे. आज आंबेडकरी चळवळीसमोर सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे कार्यक्रमातून धोरणकडे निर्मिती कडे, आणि भावनिकतेतून विवेकाकडे संक्रमण. करण्याची गरज निर्माण झाली आहे.पण यासाठी Policy Think Tanks ची निर्मिती, शासन निर्णय, अभ्यास समित्या, शिक्षित मध्यमवर्गाचे रणनीतिक संघटन, सत्तेवर सातत्यपूर्ण संस्थात्मक दबाव,संघटित राजकीय नेतृत्व विकास, या बाबी अपरिहार्य झालेले आहेत.

म्हणून शेवटी असं म्हणावसे वाटते की आंबेडकरी चळवळ जर फक्त उत्सव, स्मृतीदिन आणि औपचारिक गौरवांपुरती मर्यादित राहिली, तर ती बाबासाहेबांच्या क्रांतिकारी राजकीय प्रकल्पाशी प्रतारणा ठरेल. बाबासाहेबांनी उभारलेली चळवळ ही सत्ता पुनर्वाटपाची, धोरण पुनर्रचनेची आणि सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व मोडणारी ऐतिहासिक प्रक्रिया होती.आज त्या चळवळीला कार्यक्रमांपलीकडे जाऊन धोरणात्मक, संस्थात्मक आणि सत्ताकेंद्रित संघर्षाचेल नवे प्रारूप घडवावे लागेल. अन्यथा, आंबेडकरी चळवळ इतिहासात स्मरणोत्सवाची चळवळ म्हणूनच नोंदली जाईल, परिवर्तनाची नव्हे.

# ब्राम्हणधर्माने शेकडो वर्षे सतीप्रथेच्या नावाखाली लक्षावधी स्त्रियांना जिवंत जाळले

इंग्रज सरकारने कायद्याचा बडगा दाखवून ही विकृत प्रथा बंद केल्यावर ब्राम्हणधर्माच्या नियंत्यांद्वारे होळी सणाशी होलिकादहनाची काल्पनिक कथा जोडण्यात आली. मुळात आपले सगळे सण व उत्सव शेतीशी निगडित आहे. होळीही यास अपवाद नाही. हिवाळ्याचा कडाका संपून उबदार हवामानाची सुरुवात म्हणून हा सण पूर्वापार साजरा केला जात असे. ब्राम्हणांनी इतर सर्व सणांप्रमाणे याही सणाचे ब्राह्मणीकरण करून त्याला होलिका व प्रल्हादाची काल्पनिक कथा जोडली. ब्राम्हणांनी अनेक भयंकर बाबी धर्म म्हणून अज्ञानी बहुजन समाजावर लादण्यासाठी इतिहासात ज्या कोलांटउड्या मारल्या, त्यासाठी पूर्वापार चालत आलेल्या प्रथा – परंपरा, सण – उत्सव यांचाच वापर केला. आपण आता साक्षर आणि सज्ञानी झालो असून याचा वापर आपण सत्य शोधण्यासाठी केला पाहिजे. लक्षात ठेवा. सण – उत्सव आपलेच आहेत. ब्राम्हणांनी त्यावर फक्त कब्जा केला आहे. ही ब्राम्हणी पुट काढून या सण – उत्सवांचे सत्य स्वरूप समोर आणण्याचा प्रत्येक सुशिक्षित मराठा – बहुजनाने प्रयत्न केला पाहिजे.

बाळासाहेब गरुड
छ. संभाजीनगर



# खामेनींच्या हत्येनंतर भारतातील मुस्लीम रस्त्यावर; शिया मुस्लिमांच्या संतापाचे कारण काय?

इस्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर भारतातील शिया मुस्लीम संतापले आहेत. खामेनी यांच्या निधनानंतर रविवारी शिया समुदायाने रस्त्यावर उतरून शोक व्यक्त केला. उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे बडा इमामबाडा मशिदीजवळ मोठ्या संख्येने लोक जमले होते आणि त्यांनी आंदोलनादरम्यान घोषणाबाजी केली. तसेच काश्मीरमध्येही आंदोलकांनी एकत्र जमून आपला संताप आणि दुःख व्यक्त केले. महिला खामेनी यांचे फोटो हातात धरून रडताना दिसल्या, तर अनेकांनी अमेरिका आणि इस्रायल राजवटीविरुद्ध घोषणाबाजी केली. भारतात शिया मुस्लीम आंदोलने का करत आहेत? त्यांच्या संतापाचे कारण काय? खामेनी यांच्याशी नेमका संबंध काय? जाणून घेऊयात



### भारतात शिया मुस्लीम आंदोलने का करत आहेत?

शिया समुदायासाठी इराणचे सर्वोच्च नेते हे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व नाहीत. त्यांना 'मर्जा–ए–तकलीद' मानले जाते. याचाच अर्थ भारत, विशेषतः श्रीनगर, लखनऊ आणि हैदराबादमधील शिया समुदाय त्यांच्याकडे धार्मिक आणि आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून पाहतात. त्यांचे अनुयायी त्यांच्या मृत्यूला राजकीय हत्या मानत नाहीत. ते त्यांच्या हत्येला 'शहादत' (हुतात्मा होणे) म्हणून पाहतात आणि याला शिया समुदायामध्ये खोलवर महत्त्व आहे. एका आंदोलकाने पत्रकारांना म्हटले की, हा सर्वांसाठी एक संदेश आहे की जिथे कुठे शोषितांची हत्या होईल, तिथे आम्ही त्यांच्यासाठी आवाज उठवू. खामेनी मारले गेले आहेत, पण त्यांच्या पश्चात आज हजारो खामेनी जन्माला आले आहेत.

काश्मीरला कवी मुहम्मद इक्बाल यांनी 'इराण–ए–सगीर' म्हटले आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार, डोगरा राजवटीत १८८९ मध्ये उर्दूने जागा घेण्यापूर्वी सुमारे पाच शतके जम्मू–काश्मीरची अधिकृत भाषा पर्शियन (फारसी) होती. अनेक आंदोलक इराणी नेतृत्वाकडे पॅलेस्टिनी मुद्द्याचे खंबीर समर्थक आणि मध्यपूर्वेतील पाश्चात्य, विशेषतः अमेरिका आणि इस्रायली प्रभावाविरुद्ध उभे राहणाऱ्या काही मोजक्या आवाजांपैकी एक म्हणून पाहतात. अनेक भारतीय मुस्लीम संघटनांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. त्यांनी हा आंतरराष्ट्रीय कायदा आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे.

### खामेनी यांची भारत भेट

१९८९ मध्ये अयातुल्ला अली खामेनी यांनी भारताच्या काही भागांना भेट दिली होती. १९८०–८१ मध्ये, वयाच्या ४१ व्या वर्षी इस्लामिक क्रांतीनंतरच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी कर्नाटक आणि काश्मीरला भेट दिली होती. अनेक वर्षांनंतर, इराणमध्ये भारतीय नेत्यांची भेट घेताना त्यांनी महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वांचा उल्लेख केला होता. त्यांनी भारताच्या धार्मिक विविधतेचेही कौतुक केले होते.

इराणमधील सरकारी कागदपत्रांच्या नोंदीनुसार, १९७९ च्या क्रांतीनंतर दोन वर्षांनी खामेनी यांनी रुहोल्लाह खोमेनी यांच्या सरकारने सुरू केलेल्या जनसंपर्क मोहिमेचा भाग म्हणून भारताला भेट दिली होती. त्यांच्या हत्येविरोधात नवी दिल्ली, बिहार, झारखंड आणि तेलंगणामध्येही तीव्र आंदोलने पाहायला मिळाली. आंदोलकांनी खामेनी यांची पोस्टर्स हातात धरली होती आणि अमेरिका व इस्रायलच्या लष्करी कारवायांविरोधात घोषणाबाजी करत आपला तीव्र संताप व्यक्त केला.

### खामेनी यांचे उत्तर प्रदेशशी असलेले नाते

रुहोल्लाह यांचे पूर्वज सय्यद अहमद मुसावी हिंदी यांचा जन्म १८३० साली उत्तर प्रदेशच्या बाराबंकी जिल्ह्यातील किंतूर या गावी झाला. ते शिया धर्मगुरू आणि विद्वान म्हणून ओळखले जायचे. ब्रिटिश भारताला सोडून त्यांनी धार्मिक शिक्षण घेण्यासाठी इराणची वाट धरली. इराणमध्ये गेल्यानंतर त्यांनी तिथे आध्यात्मिक आणि धार्मिक कार्य करण्यास सुरुवात केली आणि कालांतराने ते तिथेच स्थायिक झाले. सय्यद अहमद मुसावी यांनी नावापुढे हिंदी हा शब्द जोडून आपली भारतीय ओळख कायम ठेवली.

इराणच्या खामेन या शहरात मुसावी स्थायिक झाले. तिथेच त्यांनी लग्न करून कुटुंब वाढवले. त्यांचा मुलगा मुस्तफा हिंदी हादेखील एक धर्मगुरू झाला. बीबीसी पत्रकार बाकर मोईन यांच्या मते, अहमद यांनी आपल्या भारतीय मुळांची ओळख जपण्यासाठी 'हिंदी' हे नाव लावले होते. अहमद यांनी १८३० मध्ये बाराबंकी सोडले. त्यांचे वडील दिन अली शाह यांनी १७०० च्या सुमारास मध्य इराणमधून भारतात स्थलांतर केले होते.

तो काळ मुघल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर भारतात ब्रिटिशांचे नियंत्रण वाढत असलेला काळ होता. इस्लामला पुनरुज्जीवनाची गरज आहे आणि मुस्लिमांनी समाजात आपले स्थान पुन्हा मिळवले पाहिजे, असे मानणाऱ्या विद्वानांपैकी ते एक होते. अहमद हिंदी यांना असे जीवन जगायचे होते जिथे ते धर्मात प्रगती करू शकतील आणि इतरांनाही तसे करण्यास मदत करू शकतील, म्हणूनच १८०० च्या सुरुवातीस त्यांनी भारत सोडला आणि १८३० मध्ये नजफमधील अली यांच्या समाधीला भेट देण्यासाठी इराक (तत्कालीन पर्शियाचा भाग) येथे गेले.

१८३४ पर्यंत ते इराणमधील खोमेन शहरात स्थायिक झाले, तिथे त्यांनी घर विकत घेतले. खोमेनमध्ये त्यांनी तीन लग्न केली आणि त्यांना पाच मुले झाली. त्यापैकी एक मुस्तफा होते, जे रुहोल्लाह यांचे वडील होते. बाकर मोईन यांच्या माहितीनुसार खामेनी यांचा जन्म १९०२ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सय्यद जवाद खामेनी होते. त्यांचे वडीलही धार्मिक विद्वान होते. अयातुल्ला खामेनी यांनीही वडिलांप्रमाणेच १९५८ ते १९६४ या काळात धर्मगुरूचे शिक्षण घेतले. शाह राजवटीत त्यांना अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला होता. १९७९ च्या चळवळीत भाग घेतल्यानंतर १९८१ ते १९८९ काळात ते इराणचे राष्ट्राध्यक्ष झाले.

# अंबड पोलिसांची 'फिल्मी स्टाईल' कारवाई; रात्रीच्या अंधारात पाठलाग करून अट्टल चोरटा गजाआड!

## पावणे दोन किलो चांदीसह दुचाकी जप्त; अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता

**अंबड । प्रतिनिधी**

शहरातील सराफा दुकान फोडणाऱ्या आणि दुचाकीसह चारचाकी वाहनांची चोरी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला अंबड पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. त्याच्याकडून तब्बल पावणे दोन किलो चांदी आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, या कारवाईमुळे आंतरजिल्हा चोरीच्या टोळीचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



**नेमकी घटना काय?**

अंबड येथील सराफा लाईनवरील 'राघव ज्वेलर्स' हे दुकान फोडून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी फिर्यादी विनोद गोविंदराव चित्राल यांच्या तक्रारीवरून अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तपास सुरू केला असता, सुरुवातीला बाळू शिरसाट (रा. कुंभेफळ) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या चौकशीतून या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार संतोष ओंकार गायकवाड (रा. तलवाडा, जि. बीड) असल्याचे निष्पन्न झाले.

**अंधारात २ किलोमीटर थरारक पाठलाग**

दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री मुख्य आरोपी संतोष गायकवाड हा कुंभेफळ शिवारातील एका शेतवस्तीवर येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने शेतवस्तीला वेढा घातला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने मागच्या दरवाजाने पळ काढला. मात्र, पोलीस कर्मचारी अरुण मुंडे आणि तुकाराम मदन यांनी मध्यरात्रीच्या अंधारात तब्बल २ ते २.५ किलोमीटर पाठलाग करून आरोपीला शिताफीने जेरबंद केले.

**अनेक चोरीच्या गुन्ह्यांची कबुली**

आरोपीने चौकशीत राघव ज्वेलर्समधील चोरीसह इतरही अनेक गुन्ह्यांची कबुली दिली आहे. यात प्रामुख्याने रांजणी (ता. घनसावंगी): सुदर्शन मांडवे यांचे सोन्या-चांदीचे दुकान आणि कौसर शेख यांचे कापड दुकान फोडल्याची कबुली. वडीगोद्री (ता. अंबड): सुनील कुऱ्हाडे यांची मोटारसायकल (चक्र१ उउ ३६९५) चोरी केल्याचे मान्य. शेवगाव (जि. अहिल्यानगर): टाटा सफारी चारचाकी वाहन चोरी केल्याची कबुली. पोलिसांनी आरोपीकडून १ किलो ७४५ ग्रॅम चांदी आणि चोरीची एक मोटारसायकल जप्त केली आहे. आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून, त्याच्याकडून आणखी काही मोठे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

**यांनी केली कारवाई**

ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके, सपोनि अमोल गुरले, पोउपनि भगवान नरोडे, बी. बी. नरोडे, यशवंत मुंडे, दिपक पाटील, अरुण मुंडे, तुकाराम मदन, धनाजी गवळे, विजय केंद्रे, अशोक भांगळ, विनोद भानुसे आणि देवा डेंगळे यांच्या पथकाने केली आहे.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे आवड आणि संधी म्हणून पहावे : डॉ.खराबे

## शंकरराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा

**अर्धापूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी देखील संशोधन क्षेत्राकडे आवड आणि संधी म्हणून पहावे असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, पुणे येथील पोस्ट डॉक्टरल रिसर्च फेलो असलेल्या डॉ.गीता खराबे यांनी केले. ते अर्धापूर येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर येथे विज्ञान दिनानिमित्त (दि.२८) रसायनशास्त्र विभागाच्यावतीने विविध उपक्रम व व्याख्यानात आभासी स्वरूपात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजय टेंगसे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा विभाग प्रमुख डॉ. विक्रम कुंटूरवार, डॉ. मंगेश पोतंगले, डॉ. पूजा फुलारे, डॉ. किरन कळणे यांची उपस्थिती होती. डॉ.खराबे यांचे संशोधन क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान आहे तसेच त्यांना नॅशनल केमिकल लॅबोरेटरी पुणे व एसीएसआयआर कडून देखील बेस्ट थिसिस अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच विज्ञान क्षेत्रातील विविध परीक्षा व संधी बद्दल माहिती देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.अजय टेंगसे म्हणाले की विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्राकडे वाटचाल करावी, नव्या उमेदीने अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करून आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे बक्षीस वितरण करण्यात आले. या नाविन्यपूर्ण उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी वनस्पतीशास्त्र व रसायनशास्त्र विभागाकडून घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाचे बक्षीस वितरणही करण्यात आले. यावेळी विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक याप्रसंगी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय प्रा.पूजा फुलारे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ.मंगेश पोतंगळे यांनी केले तर आभार प्रा.किरण कळणे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड शहरात सकल धोबी समाजाच्या वतीने संत गाडगेबाबा यांचा सुवर्ण जयंती महोत्सव साजरा

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड शहरात सकल धोबी समाजाच्या वतीने संत गाडगेबाबा यांचा सुवर्ण जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचा सुवर्ण जयंती महोत्सव या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बालाजी इबितदार यांची उपस्थिती होती. समाजप्रबोधन पर प्रबोधनकार श्री सत्यपाल महाराज यांचे शिष्य श्री संदिपपाल महाराज यांचे प्रबोधन पर सतर्कवाणी बालकिर्तनकार ह.भ.प. स्वरादिदी राजू देशमाने (सिरंजनीकर) यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमात नागरिक, महिला, युवक तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत गाडगेबाबांनी आयुष्यभर स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण प्रसार आणि समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी केला. स्वच्छता हाच खरा धर्म हा त्यांचा संदेश आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. कार्यक्रमात स्वच्छता अभियान राबविण्यात आले तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून संत गाडगेबाबांच्या कार्याची आठवण करून देत समाजात एकोपा आणि सेवाभाव वाढवण्याचे आवाहन केले. यावेळी धोबी युवा मंच, नांदेड संस्थापक अध्यक्ष अविनाश भाऊ वाघमारे, योगेश अंबुलगेकर, सचिन इबिते मांजरमकर, तानाजी इबीतदार, मुकुंद तेलंगे, अरविंद इबीतवार, कैलास तेलंगे, बालाजी कापसे, पिटू मारवाडीकर, अमर कोंडराज, गंगाधर जाधव, आकाश इबिते, दत्ता तेलंगे, शंकर रामतीर्थकर, गजानन विभुते, शंकर कापसे, रवी वाघमारे, मोहन नायके, गंगाप्रसाद पवार, बद्रीनाथ पवार, आकाश पवार परमेश्वर तेलंग, गजानन इबीतदार, दिलीप तेलंगे, संतोष इबीतवर, पपू हर्नाळ, देविदास तेलंगवाड, बालाजी आकुलकर व सकल धोबी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

# 'कोलाज भावनांचा' काव्यसंग्रहात अंतर्मनातील कल्लोळ : देवीदास फुलारी

**नांदेड । प्रतिनिधी**

कवयित्री रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनांचा' हा काव्यसंग्रह मानवी भावनांच्या विविध छटा, प्रेमाची सुक्ष्म जाणिवा आणि अंतर्मनातील कल्लोळ शब्दरंगांनी उलगडतो, असे प्रतिपादन अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देवीदास फुलारी यांनी केले. मसाप शाखा नांदेड आणि इसाप प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी शिवाजीनगर येथे रुचिरा बेटकर यांच्या या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लेखिका डॉ.वृषाली किन्हाळकर, कवी डॉ.पी. विठ्ठल आणि बालाजी इबितदार उपस्थित होते. डॉ.किन्हाळकर यांनी, स्त्रिया व्यक्त होतात अश्रूतून किंवा शब्दांतून; त्यांना समजून घेणारे कोणीतरी आवश्यक असते. व्यक्त होणे, हेच त्यांच्या अस्तित्त्वाचे विधान आहे, असे सांगितले. तर त्यापुढे बोलताना म्हणाले स्त्रियांनी लिहीत होणार अत्यंत आवश्यक आहे. रुचिरा बेटकर यांनी मांडलेल्या भावना या निर्मळ निर्भीड आणि निस्वार्थ मनाने मांडलेले आहेत स्त्री मनातील कोलाज सोडून त्यांनी कागदावर उमटवलेले शब्द अत्यंत भावनिक असल्यामुळे ती माणसाच्या मनात प्रेम निर्माण करते असे त्या म्हणाल्या.



डॉ.पी.विठ्ठल यांनी रुचिरा यांच्या कवितेत प्रेम, आत्मभान, आत्मसन्मान आणि मानवी नात्यांची जडणघडण स्पष्ट दिसते, तसेच त्यात स्त्रीविषयक सकारात्मक उर्जा आहे, असे नमूद केले. रुचिरा बेटकर म्हणाल्या, आयुष्यातील अनुभवांना शब्दरूप देणे, हा माझा प्रयत्न आहे. या संग्रहातून भावनांचा कल्लोळ वाचकांपर्यंत पोहोचविला आहे. प्रास्ताविक प्रकाशक दत्ता डांगे यांनी केले, तर सूत्रसंचालन राम तरटे यांनी केले. यावेळी साहित्य रसीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लहान वैज्ञानिकांची कमाल! शेंबोलीत विज्ञान प्रदर्शनात प्रयोगांची रेलचेल

**मुदखेड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दि. २८ रोजी प्रा. शा. शेंबोली येथे भरलेल्या शाळास्तरीय विज्ञान प्रदर्शनात बाल वैज्ञानिकांनी कल्पकतेची झलक दाखवली. थोर भारतीय शास्त्रज्ञ सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन विज्ञान शिक्षिका सुनिता केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले, तर प्रदर्शनाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बळीराम दुबेवाड यांच्या हस्ते झाले.



इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी हायड्रॉलिक जेसीबी, ज्वालामुखी, 'पाणी अडवा पाणी जिरवा', भूकंपरोधक घर, सौरऊर्जा, पवनचक्की, जलशुद्धीकरण, हवेचा दाब, पाण्याची घनता यांसारखे प्रयोग आत्मविश्वासाने सादर केले. छोट्या हातांनी उभे केलेली मॉडेल्स आणि त्यामागील शास्त्रीय तत्त्वांचे दिलेले स्पष्टीकरण पाहून उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रास्ताविकात शिक्षिका मंगला महाजन यांनी विज्ञान म्हणजे का? आणि कसे? याचा शोध घेण्याची वृत्ती असून निरीक्षण, तर्क व प्रयोगातूनच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, असे सांगितले. उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांनीही प्रदर्शनाला भेट देत प्रयोगांची माहिती जाणून घेतली. कार्यक्रमास शा. स. अध्यक्ष बळीराम दुबेवाड, तलाठी एस. एम. वच्छेवार, ग्रामसेवक प्रकाश पाटील, मुख्याध्यापक चंपत मुनेश्वर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रेरणादायी ठरलेल्या या उपक्रमाबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

# देगलूर उपजिल्हा रुग्णालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**सिटीस्कॅन सेंटरला 'NABH' मानांकन प्राप्त**

**देगलूर । अजीम अन्सारी**

येथील उपजिल्हा रुग्णालयांतर्गत कार्यरत असलेल्या क्रस्ना डायग्नोस्टिक लिमिटेडच्या सिटीस्कॅन सेंटरने आपल्या दर्जेदार आरोग्य सेवेचा ठसा उमटवत नवी दिल्ली येथील 'नॅशनल ॲक्रेडिशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स' (NABH) चे मानांकन प्राप्त केले आहे. या गौरवामुळे देगलूर उपजिल्हा रुग्णालयाच्या रुग्णसेवेची गुणवत्ता आता राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे.



या विशेष मानांकनाचे प्रमाणपत्र आमदार जितेशजी अंतापुरकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.नरेश देवणीकर,शहरातील प्रतिष्ठित डॉक्टर, लोकप्रतिनिधी आणि विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' हे ब्रीद घेऊन चालणाऱ्या या सेंटरने आतापर्यंत २२,२४० हून अधिक गरजू रुग्णांची मोफत तपासणी केली आहे. डॉ.नरेश देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे सेंटर रुग्णसेवेत तत्पर राहिले आहे.

देगलूर हे महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमेवर असल्याने याचा लाभ केवळ देगलूरच नव्हे, तर उदगीर, नायगाव, बिलोली, मुखेडसह शेजारील राज्यांतील रुग्णांनाही मोठ्या प्रमाणात होत आहे. मानांकनामुळे या सेंटरच्या विश्वासार्हतेत आणि गुणवत्तेत वाढ झाली असून, रुग्णांसाठी ही सेवा २४ तास सुरू राहणार असल्याची माहिती सेंटर इन्चार्ज राघव हवेलीकर यांनी दिली. हे यश मिळवण्यासाठी ऑपरेशन्स मॅनेजर अजित शेतफालकर, क्लस्टर मॅनेजर स्वामी विवेकानंद, डॉ.भरत बोरे, राघव हवेलीकर, चंद्रकांत कांबळे, वैभव उनवणे, विशाल कपिले, अंजनी गायकवाड आणि सत्यनारायण शेळके यांच्यासह रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

छ-इक मानांकन हे आमच्या रुग्णसेवेच्या गुणवत्तेवर बसलेली मोहोर आहे. यामुळे सर्वसामान्य रुग्णांना अधिक विश्वासाने आणि उच्च दर्जाची सेवा मिळेल.

**– राघव हवेलीकर (सेंटर इन्चार्ज)**

# शिराढोण येथे आरोग्य विभागाच्या वतिने सुवर्णप्राशन संस्कार व आरोग्य तपासणी शिबिर

**उस्माननगर । प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील शिराढोण येथील आयुर्वेदिक दवाखाना येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सत्यनारायण मुरमुरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोज शनिवार ह्या दिवशी सुवर्णप्राशन संस्कार व आरोग्य तपासणी शिबिर शासनाच्या आदेशानुसार यशस्वीरित्या पार पडले.




या शिबिरा दरम्यान नागरिकांची सांसर्गिक तसेच असांसर्गिक आजारासंबंधी तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. नागरिकांची आवश्यकतेप्रमाणे रक्त, शर्करा व इतर रक्त तपासणी करण्यात आली. सुवर्णप्राशन संस्काराचा बालकांना होणाऱ्या फायद्याबद्दल नागरिकांना माहिती देण्यात आली. यावेळी सहा महिन्यापासून ते पाच वर्षा पर्यंतच्या बालकांना सुवर्णप्राशन पाजण्यात आले. व १३५ नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र उस्माननगर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण दुलेवाड, शिराढोण येथील आयुर्वेदिक दवाखाना येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलदीप तिब्बे, स.आ. अधिकारी डॉ. बालासाहेब निखाते, स. आ. अधिकारी डॉ. प्रियंका देशमुख, फार्मासिस्ट श्री नरसिंग सुंकावार, आरोग्य सेविका श्रीमती घंटेवाड, आरोग्य सेवक, आशा व परिचर यांनी मेहनत घेवून हे शिबिर यशस्वी केले.

# बेकायदेशीररित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या तरुणावर कारवाई; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर । प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस दलामार्फत सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून लातूर शहरात अवैध धंदे व संशयित इसमांवर कारवाई करण्यासाठी विशेष गस्त व तपास मोहीम सुरू आहे.



दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्त घालत असताना रात्री सुमारे २३.१५ वाजण्याच्या सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, शाहू कॉलेज जवळील महानगरपालिका पार्किंग परिसरात रोहित कतारी नावाचा इसम संशयास्पदरीत्या बसलेला असून त्याच्याकडे धारदार शस्त्र आहे. सदर माहितीची खातरजमा करून रात्री २३.३० वाजता शाहू कॉलेज जवळील महानगरपालिका पार्किंग येथे पोलीस पथक पोहोचले असता तेथे एक तरुण बसलेला आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन नाव व पत्ता विचारला असता त्याने आपले नाव रोहित शेरसिंग कतारी (वय १८ वर्षे, रा. वीर हनुमंतवाडी, लातूर) असे सांगितले. त्याची अंगझडती घेण्यात आली असता त्याच्या कमरेला एक लोखंडी कोयता आढळून आला. सदर शस्त्र बेकायदेशीररीत्या बाळगलेले असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर कोयता ताब्यात जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी आरोपी रोहित शेरसिंग कतारी याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ४/२५ प्रमाणे पोलीस ठाणे गांधी चौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोउपनि राजेश घाडगे, पोउपनि अमर केंद्रे, सफौ सर्जेराव जगताप, संजय कांबळे, रियाज सौदागर, प्रशांत स्वामी, व्यंकटेश निटूरे, चंद्रकांत केंद्रे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय लातूर शहर येथील महेश पारडे व गणेश मोरे यांनी पार पाडली. लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

# धाराशिव तालुक्यात डॉ. मृणाल जाधवयांच्या नेतृत्वाखाली 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान'

## नागरिकांसाठी विशेष सेवा शिबिर सुरु; शेतकरी, विद्यार्थी व ग्रामस्थांसाठी थेट प्रशासनाची उपलब्धता

**धाराशिव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान टप्पा क्र. १' अंतर्गत नागरिकांना विविध प्रशासकीय, जमीन व शैक्षणिक सेवा सुलभ करण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांत Single Day Service Delivery द्वारे नागरिकांना आवश्यक सेवा एका दिवसात उपलब्ध करून दिल्या जातील. यामुळे शेतकरी, विद्यार्थी व ग्रामस्थांना प्रशासनाकडे जाण्याची वेळ व ऊर्जा वाचेल, तसेच त्यांच्या समस्या त्वरित सोडवल्या जातील.



तालुक्यातील शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. शिबिर आयोजित गावांची यादी (तारीखासह): केशोगाव – ०७/०३/२०२६, बेंबळी – १२/०३/२०२६, तेर – १४/०३/२०२६, करजखेडा – १७/०३/२०२६, ढोकी – १८/०३/२०२६, येडशी – २५/०३/२०२६, आंबेजवळगाव – ०८/०४/२०२६, जागजी – १०/०४/२०२६ पाडोळी – १७/०४/२०२६, धाराशिव ग्रामीण – ०८/०५/२०२६, धाराशिव शहर – १५/०५/२०२६.

शिबिरांत उपलब्ध सेवा १.७/१२ नोंदी व मोहीम अंतर्गत ७/१२ वाचन व नोंदी तपासणी, २.सामाजिक व आर्थिक योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकृती, ३.विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कामकाजासाठी आवश्यक कागदपत्रांची नोंदणी, ४.मंजूर फेरफार व खाते उतारा/नोंदी उपलब्ध करणे, भूमी व तुकड्याबंदी संदर्भातील शासकीय मार्गदर्शन, ५.अकुशल तारणगी सुधारणा संदर्भातील मार्गदर्शन.

सर्व ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कृपया आवश्यक कागदपत्रांसह या शिबिरात उपस्थित राहावे. हे शिबिर फक्त नोंदी पूर्ण करण्यासाठी नाही, तर आपल्या दैनंदिन समस्या – जसे की जमीन व तुकड्याबंदीचे मुद्दे, शैक्षणिक व सामाजिक योजनांतील अर्ज, शासकीय मार्गदर्शन – त्वरित सोडवण्यासाठी आयोजित करण्यात आले आहेत.

आपल्या प्रत्येक समस्येवर प्रशासनाची थेट दखल घेतली जाईल आणि गावस्तरावरून त्यांच्या त्वरित निराकरणासाठी प्रयत्न केले जातील. शिबिराद्वारे आम्ही नागरिकांना फक्त सेवा देत नाही, तर त्यांचा विश्वास, सुरक्षितता आणि जीवनातील सुलभता वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत. आपल्या उपस्थितीमुळे हे शिबिर अधिक यशस्वी होईल आणि शासनाची थेट सेवा आपल्यापर्यंत पोहचेल. आपण सर्वांनी सहभागी होऊन आपले हक्क व सुविधांचा लाभ घेणे गरजेचे आहे. या शिबिराद्वारे नागरिकांना प्रशासनाची प्रत्यक्ष मदत मिळणार आहे, तसेच गावस्तरावरून समस्यांचे त्वरित निराकरण होईल, ज्यामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि सुलभ बनेल.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी!

# शेतकरी विरोधी सरकारच्या नावाने बोंबा ठोकल्या

## एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखू लागवडीस परवानगी द्या : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२ होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.




निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच) माजी सैनिक अशोक येडे (बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), रामधन जमाले (बीड जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे (बीड जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना), सुहास जायभाये (बीड जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय), डॉ.संजय तांदळे (अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ता संघटना बीड), प्राचार्य डी.जी.तांदळे (बीड अध्यक्ष किसान सभा महाराष्ट्र राज्य), प्रा.कॉ. विठ्ठलराव सवासे (किसान सभा म.रा.बीड), प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ, माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते.

एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारतात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन महाराष्ट्र सर्वप्रथम क्रमांकावर असुन ३८.५ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मराठवाड्यात बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नविन वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. निसर्गाची अवकृपा, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला योग्य भाव नसणे, शेतीमालाला निर्यातबंदी आणि कर्जबाजारीपणा या शेतकरी विरोधी धोरणा बरोबरच कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तु कायदा, जमिन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी कायदे रद्द करण्यात यावेत.शेतीमालाला निर्यातबंदी कायमची रद्द करावी. तसेच शेतीमालाला भाव मिळत नसल्याने एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना सशर्त गांजा, अफु, तंबाखू लागवडीस परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

# नशा मुक्त भारत अंतर्गत तंबाखूजन्य पदार्थाची व नशांच्या पदार्थांची होळी

**बीड । प्रतिनिधी**

संस्कृती विद्यालय नगर रोड बीड येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आज बीड शहरातील संस्कृती विद्यालय या शाळेच्या प्रांगणात तंबाखूजन्य पदार्थाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता नलावडे, तत्त्वशील कांबळे ज्योती गायकवाड आदी उपस्थित होते.



समाजामधील युवकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत आहेत जाहिरातीच्या माध्यमातून व्यसनाकडे युवकांचे आकर्षण वाढत आहे. व्यसनामुळे समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे किशोरवयीन वयामध्ये बालकांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे गरजेचे आहे. मुळातच व्यसनच लागू नये याकरिता शाळा महाविद्यालयामध्ये प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे. विद्यार्थी, महिला व युवकांमध्ये वाढते व्यसनाचे व तंबाखूचे प्रमाण हे जीवनास हानिकारक आहे. कॅन्सरचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. किशोरवयीन बालके ही विविध प्रकारचे व्यसन करत आहेत व्यसनाचे दुष्परिणाम जीवनात खूप ठिकाणी जाणवत आहे ते कमी व्हावे म्हणून प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात व्यसन बंद केले पाहिजे त्यामुळे जे जे व्यसन करतात त्यांनी होळीच्या दिवशी आपल्या जीवनातील व्यसनांचा नाश करणे गरजेचे आहे व्यसन सोडून चांगली जीवनाला सुरुवात करावी, असे आवाहन यावेळी तत्त्वशील कांबळे यांनी केले.

यावेळी दत्ता नलावडे यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ व व्यसनी पदार्थापासून दूर राहण्यासंबंधीचे मार्गदर्शन केले. होळी दिवशी सर्वांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

# १४ मार्चला वडवणीत डॉ.भीमराव आंबेडकर यांची उपस्थिती; पाचव्या बौद्ध धम्म परिषदेला ऐतिहासिक रंग

## भारतीय बौद्ध महासभेच्या महिलांकडून धम्म परिषदेचा जोरदार प्रचार-प्रसार

**वडवणी । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार, महामानव बोधिसत्व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभा या संघटनेच्या माध्यमातून तळागाळातील समाजापर्यंत धम्माचा संदेश पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. समाजामध्ये चांगले संस्कार रुजावेत, वर्तमान पिढी सक्षम, संस्कारित व सुरक्षित व्हावी तसेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक विकास साधावा, या उद्देशाने धम्मप्रसार अधिक प्रभावी करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.



याच पार्श्वभूमीवर डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर हे १४ मार्च रोजी वडवणीत आयोजित पाचव्या बौद्ध धम्म परिषदेला उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे परिषदेला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले असून बौद्ध बांधवांसह बहुजन समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या चार धम्म परिषदांचे आयोजन प्रा. प्रकाश खळगे सर यांच्या पुढाकारातून पिंपरखेड येथे यशस्वीपणे पार पडले होते. यंदा मात्र त्यांनी डॉ. भीमराव आंबेडकर यांना वडवणीत आणण्याचा निर्धार केला आणि तो यशस्वीही ठरला. त्यामुळे यंदाची परिषद अधिक भव्यदिव्य होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. दरम्यान, वडवणी शहरातील व परिसरातील भारतीय बौद्ध महासभेच्या महिलांनी परिषदेचा प्रचार आणि प्रसार हाती घेतला असून घराघरांत जाऊन नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. महिलांच्या या पुढाकारामुळे शहरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून धम्मपरिषदेबाबत उत्सुकता वाढली आहे.

दि. ०५ मार्च ते १४ मार्च २०२६ या कालावधीत श्रामणेर शिबिर तसेच भव्य बौद्ध धम्म परिषद सोहळा वडवणी शहरातील नागवंशी बुद्ध विहार, ताडसोन्ना रोड येथे संपन्न होणार आहे. या कालावधीत विविध धार्मिक, सामाजिक व बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या पवित्र कार्यासाठी सर्व बौद्ध उपासक-उपासिका व समाजबांधवांनी तन-मन-धनाने सहकार्य करून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा वडवणी व नागवंशी बुद्ध विहार वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेपवाडीत प्रतिबंधित गुटखा जप्त; ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त, एकावर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर हद्दीत प्रतिबंधित गुटखा व पानमसाला विक्रीसाठी साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत शेपवाडी येथे छापा टाकून सुमारे ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १ मार्च २०२६ रोजी शेपवाडी येथे इसम नामे रविकिरण ज्योतीबा शेप (वय २८, रा. शेपवाडी) याच्या घरात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व पानमसाला विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. मा. पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला.

छाप्यात विमल पानमसाला व त्याचे तंबाखू पाऊच तसेच डिरेक्टर पानमसाला व त्याचे तंबाखू पाऊच असा एकूण अंदाजे ५५,००० किमतीचा प्रतिबंधित माल आढळून आला. पोलिसांनी तात्काळ मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ८४/२०२६ अन्वये कलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई नवनित काँवत (पोलीस अधीक्षक, बीड), श्रीमती चेतना तिडके (अप्पर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई) व ऋषीकेश शिंदे (सहाय्यक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईदरम्यान पोनि शरद जोगदंड, पोउपनि शिंदे तसेच पोलीस कर्मचारी तेजेश वाहुळे, अमोल गायकवाड, सुशांत गायकवाड, भागवत नागरगोजे व युवराज राठोड यांनी सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करत आहेत.

# पंचशील नगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची निवड

## जिल्ह्यातील पहिली 'डी.जे. (डॉल्बी) मुक्त' जयंती साजरी करण्याचा आदर्श निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव २०२६ निमित्त पंचशील नगर, बीड येथे उत्सव समितीच्या नव्या कार्यकारिणीची निवड उत्साहात पार पडली. त्रिरत्न बौद्ध विहार, पंचशील नगर येथे नगरसेवक प्रमोद (आण्णा) शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक संपन्न झाली. बैठकीत यंदाची जयंती भव्य, दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील तसेच शहरातील पहिली 'डी.जे. (डॉल्बी) मुक्त' डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याचा ऐतिहासिक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. ध्वनीप्रदूषणाला आळा घालत विचारप्रधान, प्रबोधनपर आणि सामाजिक संदेश देणारा उत्सव साजरा करण्याचा हा आदर्श उपक्रम ठरणार आहे.



तेजस वडमारे | तेजस खरात | अशोक जावळे

अध्यक्ष: अॅड.तेजस वडमारे, उपाध्यक्ष: तेजस खरात, सचिव: अशोक जावळे, सहसचिव: मयंक जाधव, कोषाध्यक्ष: शुभम सोनवणे, कार्याध्यक्ष: आनंद खेमाडे सदस्य: आदेश मगर, संजय ठोकळ, विजय विद्यागार, ओंकार सोनवणे ही निवड सर्वानुमते करण्यात आली. बैठकीस प्रमुख मार्गदर्शन म्हणून नगरसेवक प्रमोद (आण्णा) शिंदे यांच्यासह संजय मिसाळ, महेंद्र वडमारे, संतोष जोगदंड, के.के. वडमारे, मीना (ताई) मस्के, अलका (ताई) डोंगरे व वंदना (ताई) पंडित उपस्थित होते. यंदाच्या जयंतीचा मुख्य उद्देश म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजजागृती करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला.यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, दानदाते, समाजबांधव व महिला मंडळ उपस्थित होते.आपण सर्वांनी मिळून हा उत्सव अभूतपूर्व, विचारप्रधान आणि समाजासाठी प्रेरणादायी करूया, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले.



# गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त भव्य कार्यक्रम संपन्न

**नांदेड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सकल धोबी समाजाच्या वतीने आज सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प. स्वरा दीदी राजू देशमाने यांच्या ओजस्वी कीर्तनाने झाली. कीर्तनातून राष्ट्रसंतांच्या विचारांचा जागर जागर प्रसार करण्यात आला व समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. यावेळी कष्ट साधना पुरस्कार देऊन डॉ. शिवराज गंगावळ यांच्या आई-वडिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कष्ट, संस्कार आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. जयंतीनिमित्त दरवर्षी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना कै. शिवाजीराव नागोराव इबितदार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पारितोषिक जाहीर करण्यात आले. तसेच नांदेड शहरात गाडगे महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. बालाजीराव ईबितदार होते. यावेळी ओबीसी भूषण मा.सटवाजी माचनवार, नगरपरिषद संघटनेचे मा. रामेश्वरजी वाघमारे, मा. सुनील लोणवडे, मा. माधव बळेगावकर, मा.संघरत्न कांबळे, मा. रामचंद्र येईलवाड, प्रा. अनिल मोरे, मा. बजरंग तेलंग, मा. अविनाश वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा योगेश अंबुलगेकर यांनी केले. प्रास्ताविक सचिन विभुते तर आभार अरविंद इबितवार यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तानाजीराव इबितदार, मुकुंद तेलंग, बालाजी कापसे, अरविंद इबितवार, सचिन विभुते, पिंटू मारवाडीकर, सचिन इबिते मांजरमकर, कैलास तेलंगे, अमर कोंडराज, गंगाधर जाधव, आकाश इबिते, दत्ता तेलंगे, शंकर रामतीर्थकर, गजानन विभुते, विजय तेलग, शंकर कापसे, रवी वाघमारे, मोहन नायके, गंगाप्रसाद पवार, बद्रीनाथ पवार, आकाश पवार, परमेश्वर तेलंग, गजानन इबितदार, दिलीप तेलंगे, संतोष इबितवर, पप्पू हर्नाळ, देविदास तेलंगवाड, बालाजी आकुलकर आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता सत्यपाल महाराजांचे शिष्य संदीप पाल महाराज यांच्या प्रबोधनपर मार्गदर्शनाने झाली. संपूर्ण कार्यक्रम राष्ट्रसंतांच्या विचारांनी प्रेरित आणि समाजएकतेचा संदेश देणारा ठरला.

# रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ दिमाखात संपन्न

## सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव; प्रेरणादायी सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देऊन त्यांचा उत्साह वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अत्यंत भव्य आणि दिमाखदार वातावरणात उत्साहात पार पडला. यशवंतराव चव्हाण सभागृहात उपस्थित मान्यवर, कलाकार आणि नागरिकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात सन्मानितांचा गौरव करण्यात आला.



हा सोहळा प्रतिष्ठानच्या रोहिणीताई गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व आयोजन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी केले होते. त्यांच्या नियोजनबद्ध कामामुळे संपूर्ण कार्यक्रमात शिस्त, उत्साह आणि प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रमुख उपस्थिती राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची पारंपरिक कोळी वेशातील दमदार एन्ट्री. त्यांच्या आगमनाने सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी प्रतिष्ठान अध्यक्षा द्रौपताबाई पठारे, ज्येष्ठ समाजसेवक कैलास दादा पठारे, विठ्ठल मूर्तीवार, मंजू ताई पठारे, अक्षय कलाकार, बंडोपंत सोळुंके, चित्रपट मंडळाचे प्रशांत होर्शीळ सर, समाजसेवक सुशीलजी खटोड, एम.एस. कन्स्ट्रक्शनचे संचालक साथीराम अण्णा ढोले, ओबीसी फाउंडेशनचे लक्ष्मण लटपटे, संतोष अवताडे (अहिल्यानगर) तसेच सोशल मीडियावर लोकप्रिय इंस्टाग्राम रील स्टार लखन चव्हाण, ओम पावले, खंडू तात्या आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. सन्मानितांमध्ये प्रमोद रामदासी, लक्ष्मीकांत रुईकर, आदिम राज बहुउद्देशीय संस्था (रामू मोते), सुशील हरिभाऊ कोळेकर, पसायदान सेवा केंद्रचे गोवर्धन दराडे, सरोज आनंदकर (नागपूर), संगीता माने (क्राईम ब्रँच, मुंबई), प्रमोद गोरक्षनाथ चांदणे, प्राची चांदणी, देविदास उत्तम शेलार आणि नयना रतन कानडे यांचा समावेश होता. सन्मान स्वीकारताना मान्यवरांनी आपल्या कार्याचा अनुभव मांडत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी केले. प्रतिष्ठानचे सदस्य गणेश माने, किशोर कुलकर्णी, प्रकाश देवा, जाकीर भाई, विकास धोत्रे, गुड्ड्या जोगदंड, महादेव सवाई, मीनाक्षी देवकते, नयना भाकरे, नेहा साबळे व इतर कार्यकर्त्यांनी परिश्रमपूर्वक जबाबदाऱ्या सांभाळून कार्यक्रम यशस्वी केला. भव्य-दिव्य वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले. रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना नवी ऊर्जा, आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळाली असून, समाजकार्याची नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

दैनिक, **प्रवक्ता लोकशाहीचा** हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **मुजमुले नितीन रावण** यांनी मुद्रक,जगमित्र ऑफसेट,बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता,परळी वै,जि,बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा कार्यालय, रावण मुजमुले हाऊस नं.८०४, बिल्डींग नं.१९६ कानोबा नगर नाथापूर रोड, न्यू जीवनदीप सिनीयर कॉलेज पिंपळनेर ता.जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील) मो,९६७३२१०४३८ - ई-मेल- pravaktalokshahichagmail. com

The Daily newspaper, Pravakta Lokshahicha, is published by its publisher, owner, and editor, Mujmule Neetin Rawan. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Pravakta Lokshahicha Daily office, S/O RAWAN MUJMULE HOUSE NO. 804,BUILDING NO .196 KANOBA NAGAR NATHAPUR ROAD NEAR JEEVANDEEP SENIOR COLLEGE PIMPALNER TAL.DIST.BEED, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the Daily. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 9673210438 - Email: pravaktalokshahicha@gmail. com